मुंबई विद्यापीठ

क्र. घ.म./ 82 / २०१२ - २०१३

परिपत्रक :-

संदर्भ - १) विद्यापीठ परिपत्रक क्र. संलग्नता व मान्यता /४४५/२००५ दिनांक २७/१०/२००५.
२) विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./४४६/२००७ दिनांक ०७/११/२००७.
३) विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./१५१/२००८ दिनांक ०४/०४/२००८.
४) विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./पी.आय.वो./२६९/२००८ दिनांक २५/०६/२००८.
५) विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./पी.आय.वो./१०१/२००९ दिनांक २३/०३/२००९.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राचार्यांमार्फत संस्थाचे सचिव / अध्यक्ष यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने वेळोवेळी परिपत्रके निर्गमित करून अपिलिय प्राधिकारी, माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांच्या नेमणूका ताबडतोब करण्यात याव्यात व त्यांच्या नावाचे फलक महाविद्यालयात दर्शनी जागेवर सामान्य नागरिकांना दिसतील अशा ठिकाणी लावण्यात यावेत, असे कळविले होते. परंतु अद्यापपर्यंत काही महाविद्यालयांनी त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही असे दिसून येत आहे.

अपिलिय प्राधिकारी, माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांच्या नेमणूका महाविद्यालय स्तरावर होत नाहीत असे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे यद्वारे पुन्हा विनंती करण्यात येते की, अपिलिय प्राधिकारी, माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांच्या नेमणूका तात्काळ कराव्यात व त्यांच्या नावाचे फलक महाविद्यालयात दर्शनी ठिकाणी लावावेत. जे महाविद्यालय याची दखल घेणार नाहीत त्या महाविद्यालयांची नावे शासनास कळविण्यात येतील याची नोंद घ्यावी.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २५/३/१३

कुलसचिव